**Q1. शाहू महाराजांनी कोल्हापूरात कोणत्या सुधारणा घडवून आणल्या?**

(a) अस्पृश्यता व जातीभेद निवारण

(b) बालविवाहास विरोध

(c) पडदा पद्धतीस विरोध

(d) सतीच्या चालीस बंदी

**Q2. महात्मा फुले यांनी कोणते पुस्तक लिहिले नाही ?**

(a) गुलामगिरी

(b) जातींचा उच्छेद

(c) शेतकऱ्यांचा आसूड

(d) ब्राह्मणांचे कसब

**Q3. "भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न" हा ग्रंथ कोणी लिहिला ?**

(a) डॉ. बी. आर. आंबेडकर

(b) महात्मा ज्योतिबा फुले

(c) वि.रा.शिंदे

(d) भास्करराव जाधव

**Q4. ते लहूजींचे शिष्य होते.**

लहूजींना त्यांचा अभिमान होता.

ते लहूजींकडून मल्लविद्या, तलवार चालवणे, दांडपट्टा, बंदूक चालविणे इत्यादी शिकले.

त्यांचा कल समाजिक सुधारणांकडे होता.

ते कोण ?

(a) महात्मा ज्योतीबा फुले

(b) मेघाजी लोखंडे

(c) यशवंत फुले

(d) नारायण लोखंडे

**Q5. खालील व्यक्तींपैकी कोणी फर्ग्यूसन महाविद्यालयात गणिताचे अध्यापन केले होते?**

(1) बी.जी. टिळक

(2) जी. के. गोखले

(3) धों. के. कर्वे

पर्याय :

(a) (1), (2) फक्त

(b) (1), (3) फक्त

(c) (2), (3) फक्त

(d) (1), (2), (3)

## Solutions

S1. Ans (a)

Sol.शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश शाहूंनी कोल्हापूर संस्थानात काढला होता. 1917 साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली होती.

S2. Ans (b)

Sol. गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड , ब्राह्मणांचे कसब ही पुस्तके महात्मा फुलेंनी लिहिली आहेत. तर

जातींचा उच्छेद हे पुस्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले आहे.

S3. Ans (c)

Sol. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हा ग्रंथ वि.रा.शिंदे यांनी लिहिला आहे .

त्यांची अजून काही पुस्तके- 1) Untouchable of India

2) माझ्या आठवणी व अनुभव

3) कानडी - मराठी संबंध

4) मराठ्यांची पूर्वपीठिका

5) भागवत धर्माचा विकास

6) History of Parihars

S4. Ans (a)

Sol. वरील वर्णन महात्मा ज्योतीबा फुले यांचे आहे.

S5. Ans (d)

Sol. बी.जी. टिळक, जी. के. गोखले, धों. के. कर्वे या सर्वांनी फर्ग्यूसन महाविद्यालयात गणिताचे अध्यापन केले होते.